# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०८ जुलै, २०२४ / आषाढ १७, १९४६ ( शके )**

**(१) उप मुख्यमंत्री**
**(२) मृद व जलसंधारण मंत्री**
**(३) गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री**
**(४) राज्य उत्पादन शुल्क मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३३**

---

**हरणवस्ती, कोपर्डी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील एका तरुणास केलेली मारहाण**

**(१) * ८०९८९ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हरणवस्ती, कोपर्डी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील श्री. नितीन कांतीलाल शिंदे या दलित युवकास गावगुंडांनी विवस्त्र करुन जातीवाचक शिवीगाळ करत अमानुष मारहाण केल्याने युवकाने आत्महत्या केल्याचे दिनांक १ मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मारहाणीनंतर युवकाने आत्महत्त्येस प्रवृत्त करणाऱ्या संबंधित व्यक्तींच्या नावांची चिठ्ठी आत्महत्त्येपूर्वी लिहून ठेवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी मृताच्या नातेवाईकांनी तक्रार दाखल केल्यानंतर संशयीत आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृताच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी कर्जत पोलीस ठाणे, जि.अहमदनगर येथे दिनांक ०२.०५.२०२४ रोजी भा.दं.वि. कलम-३०६, ३२७, ३२४, ५०४, ३४ सह अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम, १९८९ चे सुधारणा अधिनियम सन-२०१५ चे कलम ३ (२)(v), ३ (१)(r), ३ (१)(s), ३ (२) (v a), ३ (१)(e), ३ (१)(za)(c) अन्वये गु.र.क्र.३२५/२०२४ दाखल करण्यात आला आहे.

(४) मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देणेबाबत सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग, अहमदनगर या कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना दिनांक ०८.०५.२०२४ पासून न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हरंगुळ (जि. लातूर) येथील महाविद्यालयीन विद्यार्थिनीचे अपहरण करुन केलेला खून**

**(२) * ८३६४७ श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हरंगुळ (जि.लातूर) येथील पुणे शहरात अभियांत्रिकीचे शिक्षण घेणारी विद्यार्थिनी कु.भाग्यश्री सूर्यकांत सुडे हिचे अपहरण करुन खंडणीसाठी खून करण्यात आल्याचे दिनांक ३० मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणातील आरोपींना लवकरात लवकर शिक्षा होण्यासाठी जलदगती न्यायालयात खटला चालवावा, विशेष सरकारी वकीलाची नियुक्ती करण्यात यावी तसेच दोषींना फाशीची शिक्षा देण्यात यावी, आदी मागण्यांसाठी लातूर शहरात विविध पक्ष, संघटना व नागरिकांच्या वतीने न्याय मोर्चा काढून निषेध नोंदविण्यात आल्याचे दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणामुळे ग्रामीण भागातून शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या विद्यार्थिनी व पालकांमध्ये भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

दि.१२.०४.२०२४ रोजी शिवाजी नगर पोलीस स्टेशन हद्दीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क लातूर येथून छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर आणि दि.१५.०४.२०२४ रोजी उदगीर पोलीस स्टेशन हद्दीत छत्रपती शिवाजी महाराज चौक, उदगीर येथून आंबेडकर चौक, उदगीर पर्यंत कॅन्डल मार्च काढण्यात आले होते.

(३) महाविद्यालयीन विद्यार्थिनी, विद्यार्थी, आय.टी. कंपनी तसेच इतर नोकरदार महिला यांच्या सुरक्षेसाठी पुणे शहर पोलीस दलातर्फे प्रत्येक पोलीस ठाणे स्तरावर बडी कॉप, महिला दक्षता, पोलीस काका, पोलीस दिदी, दामिनी मार्शल अशा उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यांतर्गत आय.टी. कंपन्या, महाविद्यालये, शाळा, होस्टेल यांना नियमित भेटी देऊन महाविद्यालयीन विद्यार्थिनी, विद्यार्थी, आय.टी. कंपनी तसेच इतर नोकरदार महिला यांच्या समस्या समजून घेऊन त्यांना कायदेशीर व सुरक्षेविषयक योग्य ते मार्गदर्शन करण्यात येते. बडी कॉप, महिला दक्षता, पोलीस काका, पोलीस दिदी, दामिनी मार्शल अंतर्गत महिला, विद्यार्थिनींचे व्हाटसॲप ग्रुप तयार करण्यात आलेले असून महिलांना सुरक्षेची गरज असल्यास त्यांना मदत, संरक्षण देण्यात येते. तसेच, शाळा, महाविद्यालये, आयटी कंपन्या, गर्ल्स होस्टेल, खाजगी क्लासेस परिसरात पोलीस गस्त ठेवण्यात येत आहे. सबब, हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी, पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यक्षेत्रातील विमानतळ पोलीस स्टेशन येथे दि.०४.०४.२०२४ रोजी गुन्हा र.न. १५७ /२०२४ भा.दं.वि.क. ३६४, ३६४ (अ), ३०२,१२० (ब), २०१, ४०४, ३४ अन्वये आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हातील ३ आरोपींना दि. ०७.०४.२०२४ रोजी अटक करण्यात आली असून सद्यस्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर खटला जलदगतीने न्यायालयात चालविण्याकरिता विशेष सरकारी अभियोक्ता यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, प्रस्तुत प्रकरणाचा पोलीस तपास चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बांधकाम व्यावसायिकांवर महारेराचे नियंत्रण नसल्याबाबत**

**(३) * ८१७८५ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संजय जगताप (पुरंदर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वसामान्य नागरीकांची घर खरेदी करतांना फसवणूक टाळण्यासाठी स्थापन केलेल्या महारेरा प्राधिकरणाकडे नोंदणी झालेल्या प्रत्येक गृह प्रकल्पाच्या प्रगतीचा अहवाल दर तीन महिन्यांनी बांधकाम व्यवसायिकांनी सादर करणे बंधनकारक

असताना नोंदणी केलेल्या २,३६९ प्रकल्पांपैकी ८८६ प्रकल्पांकडून त्रैमासिक प्रगती अहवाल महारेराकडे सादर झाला नसल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईतील २१२ प्रकल्पांसह मुलुंड (पूर्व) येथील जीवननगर सोसायटीचा गृह प्रकल्प गत १४ वर्षापासून अपूर्ण अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा बांधकाम व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाई न करता महारेराने ग्राहकांनी योग्य चौकशी करावी तसेच गुंतवणूक करतांना खबरदारी घेण्याचे आवाहन नागरीकांना केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्वत:ची जबाबदारी टाळण्यासाठी महारेराने स्वत:च असा अहवाल सादर न करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांची जिल्हानिहाय यादी संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अशा बांधकाम व्यावसायिकांवर महारेराचे कोणतेही नियंत्रण नसल्यामुळे ग्राहकांना नाहक त्रास होत असून विहित वेळेत सदनिकांचा ताबा मिळण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्राहकांना दिलासा देण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) रेरा कायदयानुसार प्रकल्प नोंदणी झाल्यावर प्रवर्तकांने दर तीन महिन्यांनी सदर प्रकल्पाची माहिती संकेतस्थळावर अद्ययावत करणे बंधनकारक आहे. माहे जानेवारी, २०२३ ते माहे एप्रिल, २०२३ या कालावधीतील २३७७ प्रवर्तकांपैकी ८८६ प्रवर्तकांनी आपली माहिती संकेतस्थळावर अद्ययावत केली नाही. अशा सर्व प्रवर्तकांना महारेरातर्फे नोटिसेस बजावण्यात आलेल्या आहेत.

(२) मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील २१ प्रकल्पांच्या प्रवर्तकांनी सदर प्रकल्पाची माहिती संकेतस्थळावर अद्ययावत न केल्याने महारेरातर्फे संबंधित प्रवर्तकांना नोटीसेस बजावण्यात आलेल्या आहेत.

मुलुंड (पूर्व) येथील जीवननगर हा प्रकल्प महारेराकडे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये नोंदणीकृत झाला असून, सदर प्रकल्प पुर्ण करण्याची प्रथम मुदत दि. ३०.०६.२०२४ होती. तदनंतर, सदर प्रकल्पास दि.३०.०६.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रर्वतकाने इमारतीचे १४ माळ्यांपर्यंतचे काम पुर्ण केले असून, महानगरपालिकेतर्फे अंशत: (Occupation certificate) भोगवटा प्रमाणपत्र दि. १७ सप्टेंबर, २०२१ रोजी प्रदान करण्यात आले आहे.

(३) महारेराने अशा बांधकाम व्यावसायिकांची बँक खाती गोठवण्याचे आदेश संबंधित बँकाना दिले असून, सह जिल्हा निबंधकांना त्यांचे प्रकल्पातील सदनिका/गाळे नोंदणी न करण्याबाबत कळविले आहे.

(४) व (५) हे खरे नाही.

ग्राहकांनी सदनिका विकत घेण्यापुर्वी पुर्ण चौकशी / माहिती घेऊन गुंतवणूक करावी, याकरिता महारेरातर्फे सदर यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येते.

बांधकाम व्यवसायिकांवर नियंत्रण आणण्याकरिता महारेरातर्फे त्यांची बँक खाती गोठविणे, सह जिल्हा निबंधकांना त्यांचे प्रकल्पातील सदनिका/गाळे नोंदणी न करण्याबाबत कळविणे अशा प्रकारची कारवाई करण्यात येते. जेणेकरुन प्रकल्प वेळेवर पुर्ण होऊन, ग्राहकांना त्यांचे हक्काचे घरे मिळतील व ग्राहकांचा त्रास कमी होईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सौर कृषी पंपाच्या किमंतीत वाढ न करण्याबाबत**

**(४) * ८१५९० श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन अपारंपारिक ऊर्जेतील सौरऊर्जेला प्रोत्साहन देत असताना सौर कृषी पंपाच्या शेतकऱ्यांच्या हिश्श्यातील रकमेत मागील वर्षापेक्षा सहा ते बारा हजार रुपये वाढ केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात पीएम कुसुम सौर कृषी पंप योजना गेल्या चार वर्षापासून राज्यात यशस्वीरित्या राबविण्यात येत असताना सौर कृषी पंपाच्या शेतकऱ्यांच्या हिश्यातील रक्कमेत अचानक वाढ केल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर करण्यात आलेली वाढ रद्द करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सौर कृषी पंपाच्या किंमतीतील वाढ रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय यांच्या दि.२२ जुलै, २०१९ अन्वये प्रसिद्ध केलेल्या व वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार देशात प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवंम उत्थान महाअभियान (पीएम कुसुम) ची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सदर योजनेअंतर्गत केंद्र शासन त्यांच्याकडील निर्धारित केलेली सौर कृषी पंपाची आधारभूत किंमत किंवा केंद्र शासनाद्वारे ई-निविदा प्रक्रियाद्वारे क्षमतानिहाय दर व पुरवठादारांची नावे नोंदणीकृत करून राज्यांना कळविते. केंद्र शासनाद्वारे सन २०१९-२०२० व २०२०-२१ मध्ये सौर कृषीपंपांचे क्षमतानिहाय दर निश्चित करण्यात आले होते. तदनंतर सन २०२३-२५ साठी ई-निविदा प्रक्रियेद्वारे सौर कृषी पंपाचे क्षमतानिहाय दर निश्चित केले आहेत. सन २०१९-२० व २०२०-२१ च्या तुलनेत सन २०२३-२०२५ चे दर यांचे अवलोकन केले असता सन २०२३-२५ साठी निविदा प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेले सौर कृषी पंपांचे क्षमतानिहाय दरात वाढ झाल्याचे दिसून येते. त्यामुळे त्याप्रमाणात शेतकऱ्यांच्या हिस्यात वाढ झालेली दिसून येते.
(२) केंद्र शासनाच्या योजनेनुसार सौर कृषीपंपाच्या किंमतीच्या ३० टक्के रक्कम केंद्र शासन, ३० टक्के रक्कम राज्य शासन व ४० टक्के रक्कम लाभार्थी शेतकऱ्यांनी द्यावयाची होती. तथापि, राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून सर्वसाधारण शेतकरी लाभार्थी हिस्सा १० टक्के, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती शेतकरी लाभार्थी हिस्सा ५ टक्के आणि ६० टक्के व ६५ टक्के रक्कम राज्य शासन व अतिरिक्त वीज कराद्वारे भरावी, असा निर्णय घेवून राज्यात दिनांक १२ मे, २०२१ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील कृषी पंप वीज जोडणीचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे अभियान सुरू करण्यात आले आहे.
(३) शेतकऱ्यांकडून सौर कृषीपंपाच्या किंमतीत झालेली वाढ रद्द करण्याबाबतची मागणी केल्याचे आढळून आलेले नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### लोणवडी (ता. नांदुरा, जि.बुलढाणा) येथील लघु पाटबंधारे प्रकल्पाची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(५) * ८४३५६ श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणवाडी (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून पाझरणाऱ्या पाण्यामुळे प्रकल्पाखालील शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे अतोनात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनास दिनांक २४ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदन देवूनही अद्यापही त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पाच्या कामाची दुरुस्ती करुन झालेल्या नुकसानाचा मोबदला देण्याबाबत तसेच संबंधित दोषी कंत्राटदार व अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) धरणाच्या खालील भागामध्ये पाझराची समस्या निदर्शनास आलेली असून त्याची कारणमिमांसा व उपाययोजना निश्चित करण्यासाठी धरण सुरक्षितता संघटना नाशिक यांना कळविण्यात आले आहे.

सन २०१६ साली पाझराच्या तक्रारी नंतर क्षेत्रिय उपाययोजना म्हणून निचरा नालीचे काम करण्यात आले आहे. त्यानंतर गट क्र.२९ चा अपवाद वगळता नुकसानीची तक्रारी आलेल्या नाहीत. गट नं.२९ च्या बाबत सन २०१८ व सन २०२० मध्ये केवळ मृत साठा असतांना दलदलीच्या तक्रारी प्राप्त होत्या. त्यानंतर गट नं.२९ मधुन सुध्दा तक्रार झालेल्या नाहीत.
(२) लोणवडी (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील लघु पाटबंधारे प्रकल्पाची कामे निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनास दिनांक २४ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारासचे निवेदन शासनास प्राप्त आहे.

(३) लोणवडी लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या कामाबाबत अधीक्षक अभियंता (तत्कालिन अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे प्रकल्प मंडळ, यवतमाळ) यांचे मार्फत प्रकल्पाचे बांधकामाचे गुणवत्तेबाबत चौकशी झालेली आहे व संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही पुर्ण झालेली आहे.

तसेच पाझरामुळे गट क्र.२९ मध्ये झालेल्या नुकसानीच्या भरपाईचे प्रकरण संयुक्त पंचनामा अभावी परत केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य उत्पादन शुल्क विभागाने अटी व शर्तींचे उल्लंघन करुन आर्केस्ट्रा बारला परवाना दिल्याबाबत**

**(६) * ८०२९६ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर):** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल, कल्याण, डोंबिवली या शहरांत काही ठिकाणी शाळा व धार्मिक स्थळांच्या परिसरात बार व मद्य विक्री सुरू असल्याचे दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईतील एपीएमसी मार्केटमध्ये सुमारे ३५ वर्षे जुन्या महिला वसतीगृहाच्या बाजुलाच उत्पादन शुल्क विभागाने अटी व शर्तीचे उल्लंघन करुन आर्केस्ट्रा बारला परवाना दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पनवेलच्या कोन गावातील शाळेच्या बाजुला तसेच कोपरखैरणे येथील सेक्टर २ मधील ज्ञानविकास शाळेच्या बाजुला आदर्शबार तर शिरवणे येथे खाली दुकान व वर बार यालाही अटी व शर्तीचे उल्लंघन करुन परवाना दिल्याचे दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

लोकमत वृत्तपत्रामध्ये दिनांक १४.०३.२०२४ रोजी ठाणे तसेच, रायगड जिल्ह्यात शाळेजवळ बार असल्याबाबतची बातमी प्रसिद्ध झाली होती. या बातमीच्या अनुषंगाने तातडीने कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.

वाशी, नवी मुंबई येथील एपीएमसी मार्केटजवळ मंजूर एफएल-३ (परमिट रुम) अनुज्ञप्त्या धार्मिक व शैक्षणिक संस्थेपासून अंतरनिर्बंधमुक्त आहेत, सदरच्या अनुज्ञप्तींपैकी एक ठिकाणी पोलीस विभागामार्फत विहित अटी व शर्तीनुसार ऑर्केस्ट्रा बार परवाना मंजूर आहे. तसेच, पूर्वी या ठिकाणी असलेले अन्नपूर्णा महिला वसतीगृह सद्य:स्थितीत बंद आहे.

(३) हे खरे नाही, प्रस्तुत प्रकरणांची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

i) पनवेलच्या कोन गावातील हॉटेल गोल्डन पाल्म (हॉटेल गोल्डन नाईट) एफएल ३ अनुज्ञप्ती अंतरनिर्बंधमुक्त आहे.

ii) कोपरखैरणे, जि.ठाणे येथील सेक्टर २ मध्ये ज्ञानविकास शाळेच्या बाजूला मे. आदर्श रेस्टॉरन्ट ॲण्ड बार या नावाची नमुना एफएल-३ अनुज्ञप्ती मंजूर नसून सेक्टर १/ए, येथे मंजूर करण्यात आलेली आहे. सदर अनुज्ञप्ती जवळ खाजगी संस्थेचे लोकमान्य इंटरनॅशनल स्कूल असून सदर शाळेची स्थापना अनुज्ञप्तीच्या मंजूरीनंतर करण्यात आली आहे.

iii) शिरवणे येथे सेक्टर ०१, शिरवणे गाव, नेरुळ, नवी मुंबई या इमारतीतील नमुना सीएल-३ आणि एफएल-३ या अनुज्ञप्त्या मंजूर असून विधिग्राह्य आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मलकापूर (जि.बुलढाणा) येथील कापूस व्यापाऱ्याकडे नोटा छपाईचे मशिन आढळल्याबाबत**

**(७) * ७९५९७ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) भागात शेतकऱ्यांचा कापूस घेऊन चुकारे न देताच पळून गेलेल्या कापूस व्यापाऱ्याकडे २० लाख रुपये किंमतीच्या नोटा छपाईचे मशिन आढळल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास पोलीस तपासात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलिसांनी नऊ जणांना अटक केलेली असून या प्रकरणातील व्यापाऱ्याने व त्यांच्या साथीदारानी अनेक ठिकाणी स्थावर मालमत्तेत पैसे गुंतविल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांचे चुकारे देण्यासंदर्भात तसेच संबधित व्यापारी व त्यांच्या साथीदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मलकापूर पोलीस स्टेशन येथे दिनांक ३०.११.२०२३ रोजी प्राप्त फिर्यादीच्या अनुषंगाने दाखल गु. र. नं. ६००/२०२३ च्या तपासामध्ये दिनांक ०४.१२.२०२३ रोजी रु.२० लक्ष किंमतीच्या मशीन जप्त केल्या आहेत. सदर मशीन न्याय वैद्यकीय प्रयोगशाळा, अमरावती यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे.
(२) हे खरे आहे.

गुन्ह्यातील मुख्य आरोपीने इतर आरोपींसह कट रचून त्यांच्या मदतीने शेतकऱ्यांचा कापूस बाजारभावापेक्षा जास्त दराचे आमिष दाखवून खरेदी करुन त्यांना त्याचा मोबदला न देता मिळालेल्या पैशातून स्वत:च्या व त्याच्या पत्नीच्या नावे स्थावर तसेच जंगम मालमत्ता खरेदी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

तसेच, मुख्य आरोपीने शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करुन मिळालेल्या पैशातून जळगाव येथील जिनिंग व प्रेसिंग कारखाना रु.२ कोटी १ लाख रुपयात खरेदी केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.
(३) सदर गुन्ह्यात मुख्य आरोपीसह अन्य १३ आरोपींना अटक करण्यात आलेले असून ९ आरोपींविरुध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून उर्वरित ५ आरोपींविरुध्द पुरवणी दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले आहे.

गुन्ह्यातील आरोपींना अटक करुन त्यांचे नावे असलेले बँक खाते गोठविण्यात आली आहेत.

मुख्य आरोपी व त्याच्या पत्नीची स्थावर मालमत्ता मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली असून सदर मालमत्ता विक्री हस्तांतरण होऊ नये याकरिता महसूल दप्तरी तसेच दुय्यम निबंधक मलकापूर यांचे अभिलेख्यावर नोंद घेण्याकरिता सि.आर.पी.सी.१९७३ चे कलम १०५ (ड) प्रमाणे विशेष न्यायालयाकडून आदेश होण्यास विनंती करण्यात आलेली आहे.
गुन्ह्याचा अधिक तपास सुरु असून पुरवणी दोषारोप सादर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोनोरी (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील पुरंदर उपसा जलसिंचनाचे पाणी शेतकऱ्यांना शेतीसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८)** * ८०९४७ **श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोनोरी (ता.पुरंदर, जि.पुणे) येथे पुरंदर उपसा जलसिंचन योजनेचे पाणी शेतकऱ्यांना पैसे भरुनही अद्यापपर्यंत मिळाले नसल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतीसाठी पाणी मिळाले नसल्याने सिताफळ, डांळीब व पेरु इ. फळबागेतील झाडे कोमेजून गेल्याने शेतकऱ्यांनी सार्वत्रिक निवडणूकांवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेऊन तीव्र असंतोष व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना तातडीने सिंचन योजनेचा पाणी पुरवठा करणे, तसेच जळालेल्या फळबागांचे पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) मौजे सोनोरी गावातील शेतकऱ्यांनी लोकसभा निवडणूकीवर बहिष्कार घालण्याबाबतचे कोणतेही निवेदन अथवा पत्र प्राप्त झालेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) तालुक्यातील शेतकऱ्यांना पैसे भरुन देखील विद्युत जोडणी दिली नसल्याबाबत**

**(९) * ८१३७९ श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) तालुक्यातील सुमारे ३५०० शेतकऱ्यांनी विद्युत मीटरसाठी पैसे भरुनही महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीने अद्यापपर्यंत विद्युत जोडणी देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच धान उत्पादक शेतकऱ्यांना कमीत कमी सोळा तास वीजपुरवठा आवश्यक असताना केवळ रात्रीच्या वेळी आठ तास वीज पुरवठा करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्युत जोडणी न देणे, विजेअभावी शेतीची कामे प्रलंबित असणे, आवश्यकतेपेक्षा कमी वेळ वीज पुरवठा उपलब्ध होतो, त्यामुळे रात्रीच्यावेळी शेतकऱ्यांना शेतात जावे लागत असल्याने परिणामी वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांमुळे जिवीतास धोका निर्माण होतो अशा अनेक अडचणींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनेक वेळा निवेदन देऊनही यासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत : खरे आहे.

अर्जुनी मोरगांव जि.गोंदिया तालुक्यात दि. ०१.०४.२०१८ ते ३१.०५.२०२४ पर्यंत एकूण १९४१ कृषीपंपांना वीज जोडणी देण्यात आली असून, दि. ३१.०५.२०२४ अखेर ३६० कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत. यापुढे सदर ग्राहकांना कुसुम-बी योजनेअंतर्गत पारेषण विरहित सौर कृषीपंप आस्थापित करण्याची कार्यवाही महावितरण मार्फत करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

अर्जुनी मोरगाव (जि. गोंदिया) सहीत संपूर्ण राज्यात वीजभार व्यवस्थापन करण्यासाठी तसेच कृषी पंपांसाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेऊन मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या आदेशानुसार संपूर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास किंवा रात्री ८ तास थ्री फेज वीजपुरवठा चक्राकार पध्दतीने देण्यात येतो. गोंदिया जिल्हयासह संपूर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना तांत्रिकदृष्टया शक्य असेल अश्या ठिकाणी दिवसा वीज पुरवठा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

गोंदिया जिल्हयासह संपूर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना तांत्रिकदृष्टया शक्य असेल अश्या ठिकाणी दिवसा वीज पुरवठा करण्याचे निर्देश महावितरण कंपनीमार्फत देण्यात आले आहेत. तसेच कृषीपंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण मिशन मोडमध्ये करण्याच्या दृष्टिने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत महावितरणने गोंदिया जिल्हयात ३५ मे.वॅ. क्षमतेसाठी मार्च -२४ मध्ये कार्यादेश देण्यात आले असून याद्वारे २४ कृषी वाहिन्यांना दिवसा वीज पुरवठा करणे शक्य होणार आहे.

(४) व (५) राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा ८ तास वीज पुरवठा देणे हे मुख्य उद्दिष्ट डोळयासमोर शासनामार्फत "मुख्यमंत्री सौर कृषीवाहिनी योजना २.०" अन्वये वितरण उपकेंद्र स्तरावर विकेंद्रित सौरऊर्जा प्रकल्प उभारणीच्या माध्यमातून दीर्घकालीन योजना आखली आहे.

या योजनेअंतर्गत १२४०० मे.वॅट क्षमतेकरिता निविदा जाहीर केल्या असून, ९१५५ मे. वॅट क्षमतेसाठी कार्यादेश देण्यात आले आहेत. यामध्ये गोंदिया जिल्हयातील १५० मे. वॅट सौर प्रकल्पांचा समावेश आहे.

तसेच, शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे यासाठी १ लाख सौर कृषीपंप स्थापित करण्यासाठी शासनामार्फत "मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना" राबविण्यात आलेली असून सदर योजनेअंतर्गत संपूर्ण राज्यात एकूण १ लाख सौर कृषीपंपांची आस्थापना पुर्ण करण्यात आलेली आहे. यामध्ये गोंदिया जिल्हयामध्ये १०५७ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आलेले आहेत.

प्रधानमंत्री कुसुम योजनेच्या घटक-ब अंतर्गत ४,०५,००० सौरपंप आस्थापित करण्याचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून, आतापर्यंत राज्यात १,१९,२७८ सौर कृषीपंप स्थापित झाले आहेत. तसेच या योजनेतून गोंदिया जिल्हयात १०६१ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आलेले आहेत. या योजनेत प्रलंबित कृषीपंप वीज जोडणी ग्राहकांना प्राधान्य देण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर शहरातील पोलिसांच्या वाहनांना पुरविण्यात येणाऱ्या इंधनाचा गैरव्यवहार होत असल्याबाबत**

**(१०) * ८०८७४ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील एकूण ३४ पोलीस स्टेशनसाठी सुमारे ८०० गाडया पेट्रोलिंगसाठी फिरत असून या वाहनांना मोटर परिवहन विभागाकडून इंधन पुरविले जात असून या इंधन वापरामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच वाहनांचे स्पेअरपार्टसुध्दा काढून विकले जात असूनही याकडे संबंधित प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत पोलीस मोटर परिवहन विभागाशी निगडीत गैरव्यवहाराबाबत वृत्तपत्रात प्रसिध्द मजकुरावरुन पोलीस उप आयुक्त, मुख्यालय व इतर सदस्य यांचे समावेश असलेली चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. या चौकशी दरम्यान आरोपी सेल वाहन, मोटर परिवहन विभागातील राखीव वाहन, इत्यादी वाहनांचे लॉगबुक पडताळुन निष्कर्ष काढला असता प्रथमदर्शनी गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर समितीमार्फत चौकशी चालू आहे.

(२) स्पेअर पार्टस खरेदी-विक्रीचे एक वर्षातील व्यवहार मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे त्याच्यातील गैरव्यवहाराची चौकशी करणेकरिता विशेष लेखापरिक्षणाची गरज असल्यामुळे याकरिता महालेखाकार, नागपूर यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

(३) पोलीस उप आयुक्त, मुख्यालय व इतर सदस्य यांचे समावेश असलेल्या समितीच्या चौकशीमध्ये अहवालानुसार दोषीं आढळून येणाऱ्या पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**घाटकोपर विभाग (मुंबई) नोडल ११ चा पदभार असणाऱ्या विक्रीकर अधिकाऱ्याने केलेला गैरव्यवहार**

**(११) * ८१४५७ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या घाटकोपर विभाग (मुंबई) नोडल ११ चा पदभार असणाऱ्या विक्रीकर अधिकाऱ्याने पदाचा गैरवापर करत बनावट कागदपत्रांद्वारे १६ कंपन्यांना १७५ कोटी रुपयांचा कर परतावा मंजूर करून गैरव्यवहार केल्याचे माहे मार्च २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर १६ कंपन्यांनी माहे ऑगस्ट,२०२१ ते मार्च,२०२२ या दरम्यान त्यांच्या व्यवसाय ठिकाणाचे बनावट व खोटे भाडेकरार पत्र सादर करून सदर विक्रीकर अधिकाऱ्याच्या संगनमताने जीएसटीएन क्रमांक प्राप्त केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर करदात्यांनी विक्रीकर अधिकाऱ्याच्या आर्थिक संगनमताने शासनाला कोणताही कर भरला नसतानाही सुमारे १७५ कोटी रुपयांच्या कर परताव्यासाठी ३९ कर परतावे अर्ज सादर केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन बोगस १६ कंपन्या व करदात्यांवर आणि संबंधित अधिकारी यांचेविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करुन संबंधित अधिकाऱ्याला बडतर्फ करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) अंशत : खरे आहे.

सदर बाब मार्च, २०२२ मध्ये राज्यकर सहआयुक्त अन्वेषण-क मुंबई यांच्या कार्यालयाकडून करण्यात आलेल्या अन्वेषण कार्यवाहीमध्ये निर्दशनास आली.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) बनावट कागदपत्राच्या आधारे जी.एस.टी.चा परतावा मागितलेल्या १६ कंपन्यांच्या सुत्रधारापैकी श्री.किरण लखमशी भानुशाली, श्री.रहमत अली मोमीन यांच्यावर जी.एस.टी.कायद्याच्या कलम ६९ अन्वये अटकेची कार्यवाही अनुक्रमे दि.१२.०४.२०२२ व दि.०१.११.२०२२ रोजी करण्यात आली आहे. सदर प्रकरणात जी.एस.टी.चा परतावा मागणी केलेल्या कंपनीचे संचालक सुत्रधार इतर व्यक्ती असे एकुण १७ आरोपींविरुद्ध जी.एस.टी. कायद्याच्या कलम-१३२(१) अन्वये दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यासंदर्भात मा.न्यायालयात दि.०९.१०.२०२३ व दि.१०.११.२०२३ रोजी दोन स्वतंत्र दोषारोपपत्र (०५ प्रकरणे) दाखल करण्यात आलेले आहे.

अन्वेषण कारवाईनंतर सदर प्रकरण निदर्शनास येताच संबंधित अधिकारी श्री.लाळगे, राज्यकर अधिकारी यांना दि.१३.०५.२०२२ ते दि.२६.१०.२०२३ पर्यंत निलंबित करण्यात आले होते. तसेच सदर अधिकाऱ्याविरुध्द दि.०५.०९.२०२३ रोजी आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडे FIR करण्यासाठी तक्रार दाखल केली. त्यानुषंगाने सदर संबंधित अधिकारी श्री.लाळगे, राज्यकर अधिकारी यांच्याविरुद्ध दि.२८.०२.२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्याकडे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर अधिकारी यांना दि.२५.०६.२०२४ रोजी अटक करण्यात आली असून त्यांचा पोलीस कस्टडीमधील कालावधी हा ४८ तासांपेक्षा जास्त असल्याकारणाने त्यांना शासन सेवेतून निलंबित करण्याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे. तसेच, सदर अधिकारी यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील घरे विकण्यासाठी लागणाऱ्या ना-हरकत प्रमाणपत्राबाबत**

**(१२) * ८००६४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.योगेश सागर (चारकोप), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या (एसआरए) इमारतींमधील घर विकायचे असल्यास एसआरए चे ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) बंधनकारक असल्याचे आदेश महसूल विभागाने काढल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ना-हरकत प्रमाणपत्र काढण्यासाठी संलग्नक (Annexure) मध्ये नाव असलेल्या मूळ सभासदाच्या नावाने अर्ज करावा लागत असून त्या मुळ सभासदाच्या नावाने ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडामार्फत लावण्यात आलेल्या या जाचक अटीमुळे मूळ मालकाने घर विकल्यानंतर ज्यांनी ते घर घेतले त्यांना घर विकायचे असल्यास अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच ज्या ठिकाणी जुन्या चाळी व इमारतींचा पुनर्विकास झाला आहे या इमारतींमध्ये देखील जुन्या नावांमुळे रहिवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन एसआरए इमारतींमधील घर-विक्रीची प्रक्रिया सुलभ करण्याकरिता उक्त अट रद्द करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी कायदा (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ ई अनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत वितरित करण्यात आलेल्या पुनर्वसन सदनिकांच्या हस्तांतरणास सदनिकांचा ताबा दिल्याच्या दिनांकापासून ५ वर्षाच्या कालावधीपर्यंत प्रतिबंध करण्यात आला आहे. ५ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरही केवळ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीनेच सदनिकांच्या हस्तांतरणाची तरतूद आहे. त्यानुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या पुनर्वसन इमारतीमधील सदनिकांचे खरेदीखत नोंदणी करण्यापूर्वी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे ना-हरकत घेण्यासंबंधी प्राधिकरणातर्फे दि.०४.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांना विनंती करण्यात आली होती. त्यास अनुसरुन नोंदणी महानिरीक्षक व नियंत्रक, पुणे यांनी दि.०१.०९.२०२३ च्या पत्रान्वये प्राधिकरणाच्या दि.०४.०८.२०२३ रोजीच्या पत्रानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना नोंदणी उप महानिरीक्षक, मुंबई यांना दिलेल्या आहेत. नोंदणी उप महानिरीक्षक, मुंबई यांनी दि.२६.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये याप्रमाणे सर्वांना सूचित केले आहे.

(२) व (३) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या सदनिका ह्या झोपडीधारकांचे जीवनमान सुधारण्याच्या उदात्त हेतूने दिलेल्या असतात. त्यांची खरेदी-विक्री करणे हा योजनेचा हेतू नाही. अशा हस्तांतरणासाठी ५ वर्षाची अट व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे ना-हरकत प्रमाणपत्र बंधनकारक आहे.

मूळ झोपडीधारकांचा सदनिका हस्तांतरणाबाबतचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदनिका हस्तांतरणाबाबतची प्रक्रिया ही प्राधिकरणाच्या परिपत्रक क्र.१४५, दि.१४.१०.२०२३ नुसार करुन संबंधितांस सदनिका हस्तांतरणाबाबत मूळ लाभार्थी व खरेदीदार यांनी आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर हस्तांतरणाबाबत ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येते.

झोपडीधारकांच्या सोईसाठी सदनिका हस्तांतरण कार्यवाही लवकरच ऑनलाईन पध्दतीने करण्याचे प्रयोजन आहे.

(४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार सहकार कायद्यांतर्गत नोंदणी झालेल्या संस्थेला आपल्या नावांत बदल करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५ व नियम १४ अन्वये निर्धारित केलेल्या कार्यपध्दतीने नावात बदल करण्याची तरतूद आहे. त्या अन्वये संस्थेच्या नावात बदल करण्याचा अधिकार संस्थेतील सभासदांना असून, सभासदांनी बहुमताने ठराव पारित करून सभासदांच्या सहमतीने कोणतेही नाव बदलता येणे शक्य आहे.

(५) पुनर्वसन इमारतीमधील सदनिकांची हस्तांतरण प्रक्रिया सुलभ करण्याकरीता पुढील उपाययोजना करण्यात आल्या आहेत:-

१. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत विकसीत करण्यात आलेल्या निवासी पुनर्वसन सदनिकेचे अनिवासी गाळयाचे विहीत कालावधीनंतर सदनिकाधारकाच्या जवळच्या नात्यात म्हणजेच पती, पत्नी, मुलगा, मुलगी, नातू, नात, विधवा सून यांना बक्षिसपत्राव्दारे हस्तांतरण करावयाचे झाल्यास त्यासाठी आकारावयाचे हस्तांतरण शुल्क रु.२००/-इतके निश्चित करण्यात आले आहे.

२. महाराष्ट्र झोपडपट्टी कायदा सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मध्ये सुधारणा करण्यात आली असून पुनर्वसन सदनिका वाटपानंतर ५ वर्ष पूर्ण झाल्यानंतर सदनिका विक्री करण्यास मुभा देण्यात आलेली आहे.

३. गृहनिर्माण विभागाच्या दि.१५.१२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निवासी सदनिकांच्या हस्तांतरणासाठी आकारण्यात येणारे हस्तांतरण शुल्क रु.१ लाख वरुन ५० हजार करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण खासगी विकासकांच्या माध्यमातून पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येत असल्याने अनेक प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(१३) * ८०२१६ श्री. कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ. भारती लव्हेकर (वर्सोवा), ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड. पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री. पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री. अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री. समाधान अवताडे (पंढरपूर), श्री. मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री. संजय सावकारे (भुसावळ), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टीवासियांना पक्के घर मिळावे म्हणून मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण खासगी विकासकांच्या माध्यमातून पुनर्विकास प्रकल्प राबवीत असून गेल्या तीन वर्षांपासून जवळजवळ २०० प्रकल्प प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक ठिकाणी निधीअभावी सदर प्रकल्प प्रलंबित असल्याने नागरिकांना घरे मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रलंबित प्रकल्प तात्काळ पुर्ण करुन रहिवाशांना दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.

झोपु योजनांचा आढावा घेतला असता विविध कारणास्तव रखडलेल्या ३२० योजना त्यापैकी १०१ योजना कार्यान्वीत झाल्या असून सद्यस्थितीत २१९ झोपु योजना रखडल्या आहेत. सदर २१९ योजनांपैकी १६६ योजना हया विकासकाकडे निधी उपलब्ध होत नसल्याने रखडल्याचे आढळून आले आहे. उर्वरित योजनांपैकी २२ योजना हया विविध प्राधिकरणांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्याने तर २२ योजना ह्या न्यायालयीन प्रकरणामुळे रखडलेल्या आहेत तसेच ९ योजनांमधील विकासकांवर कलम १३ (२) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत रखडलेल्या झोपु योजना मार्गी लावण्याकरिता शासन मान्यतेनंतर तीन धोरणात्मक उपाययोजना नुसार कार्यवाही करण्यात येत आहे :-

क्र. १- निविदा प्रक्रियेने विकासकाची नियुक्ती करणे.

क्र.२- अभय योजना राबविणे

क्र.३- मुंबई महानगर प्रदेशातील झोपडपट्टी पुनर्वसन योजना अन्य महामंडळे प्राधिकरणे/स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मार्फत संयुक्त भागीदारी (JV)अन्वये राबविणे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### कोंदिवडे (ता.कर्जत, जि.रायगड) येथील उल्हास नदीपात्रात अनधिकृतपणे दगडी भिंत बांधल्याबाबत

**(१४)** * **८०७२१ श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंदिवडे (ता.कर्जत, जि.रायगड) येथील रस्त्याच्या बाजूने वाहणाऱ्या उल्हास नदीपात्रात अनधिकृतपणे दगडी भिंत बांधण्याचे काम जमीन मालकांकडून केले जात असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बांधकामामुळे गावातुन परीसरातून जाणाऱ्या नदीच्या पात्राची रुंदी कमी झाल्याने पावसाळ्यात पूरपरिस्थिती निर्माण होऊन ग्रामस्थांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक ग्रामस्थांनी तहसीलदारांना निवेदन देऊन नदीमधील भिंत बांधण्याचे काम न थांबल्यास उपोषणाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

अनधिकृत बांधकाम सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२४ मध्ये निदर्शनास आले होते.

(२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

संबधितांना विभागीय कार्यालयांमार्फत दि.०३.०१.२०२४, दि.१४.०३.२०२४ व दि.२०.०३.२०२४ रोजी वेळोवेळी नोटीस देण्यात आलेल्या आहेत व दि.०२.०४.२०२४ रोजीपासून बांधकाम बंद करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राज्य पुरातत्व विभाग आणि संग्रहालय संचालनालयाचे संचालक व नाशिक येथील पुरातत्व विभागाच्या सहायक संचालक यांनी लाच घेतल्याबाबत

**(१५)** * **८३३१५ श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य पुरातत्व विभाग आणि संग्रहालय संचालनालयाचे संचालक, डॉ. तेजस गर्गे व नाशिक येथील पुरातत्व विभागाच्या सहायक संचालक श्रीमती आरती आळे यांनी ना-हरकत दाखला देण्यासाठी एका कारखानदारांकडून दिड लाख रुपयांची लाच स्वीकारली असल्याची बाब दिनांक ७ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितावर गुन्हा दाखल करण्यात आला असून यातील दोषी श्री.गर्गे हे फरार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) I. सदर प्रकरणी, तक्रारदार यांनी जुन्या टायर पासून ऑईल बनविण्यासाठी एव्हरग्रीन कंपनी सुरु करण्यासाठी स्थानिक शेतकरी यांच्याकडून भाडे तत्त्वावर घेतलेल्या जमिनीचे मालक यांच्या नावाने पुरातत्व विभाग, नाशिक येथे ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दिला असता आलोसे आरती आळे, तंत्र सहायक, अतिरिक्त कार्यभार, सहायक संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय या प्रसुती रजेवर असतांना त्यांनी तक्रारदार यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी स्वतःसाठी व संचालक, पुरातत्व व वस्तु संग्रहालये संचालनालय यांच्यासाठी रु.१,५०,०००/- लाचेची मागणी करुन दिनांक ०७.०५.२०२४ रोजी लाचेची रक्कम स्विकारतांना त्यांच्या राहत्या घरी पंच व साक्षीदारांसमक्ष रंगेहाथ पकडण्यात आले तसेच त्यांनी सदर लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत आलोसे संचालक, पुरातत्व व वस्तु संग्रहालये संचालनालय यांना कळविले म्हणून लाचेची रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन व संमती दिल्याने दोन्ही आलोसे यांच्याविरुद्ध इंदिरानगर पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे गु.र.क्र. १४५/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग १९८८ चे कलम ७, ७अ, १२ प्रमाणे दिनांक ०८.०५.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांच्यामार्फत सुरु आहे.

II. तसेच आलोसे तेजस गर्गे, संचालक, पुरातत्व व वस्तु संग्रहालय, मुंबई हे गुन्हा घडल्यापासून मिळून येत नव्हते. त्यांचा अटकपुर्व जामीन मा.विशेष न्यायालयाने फेटाळला असुन मा. उच्च न्यायालयाने त्यांना दिनांक १२.०६.२०२४ रोजी अटी व शर्तीवर राहून अटकपुर्व जामीन मंजुर केला आहे.

(३) I. आलोसे आरती आळे, तंत्र सहायक, सहायक संचालक (अतिरिक्त कार्यभार) यांना संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये मुंबई यांच्या दिनांक १६.०५.२०२४ रोजीच्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.

II. आलोसे तेजस मदन गर्गे, संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये, मुंबई यांना पर्यटन व सांस्कृतिक विभागाच्या दिनांक ११.०६.२०२४ रोजीच्या आदेशान्वये दिनांक १६.०५.२०२४ रोजी पासुन शासन सेवेतून मानीव निलंबित करण्यात आले आहे.

III. तसेच या प्रकरणी संबंधित दोन्ही आलोसे यांच्या मालमत्तेची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून उघड चौकशी सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**छत्रपती संभाजीनगर येथील जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी घेतलेली लाच**

**(१६)** * **८२०१८ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथील जलसंधारण महामंडळाचे उप विभागीय अधिकारी श्री.ऋषिकेश देशमुख यांना रू.८,५३,२५०/- रूपये लाच स्विकारताना दिनांक ७ फेब्रुवारी, २०२३ रोजी पकडण्यात आले असल्याने त्यांना शासकीय सेवेतून निलंबित करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.ऋषिकेश देशमुख यांनी लाचेच्या रकमेतील रु.८,०३,२५०/- एवढी रक्कम श्री.सुनील कुशीरे, व्यवस्थापकीय संचालक यांचेसाठी स्वीकारल्याचे एफ.आय.आर मध्ये नोंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असे असतानाही श्री.सुशिल कूशीरे यांचेवर निलंबनाची कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी श्री.सुशिल कुशीरे यांना निलंबीत करण्याची मृद व जलसंधारण मंत्री यांचेकडे दिनांक ८ जानेवारी,२०२४ रोजी निवेदनाव्दारे मागणी करुनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यातील संबंधित अधिकारी तसेच या प्रकरणी कारवाई न करणाऱ्या संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) I. गवळी पिंपरी व गोविंदपूर, जिल्हा-परभणी येथील बंधारा कामाचे अनुक्रमे रु.१८,००,०००/- व रु.१,१९,००,०००/- असे दोन्ही कामाचे मिळून रु.१,३७,००,०००/- इतक्या रकमेच्या कामाचे देयक मंजूर करण्यासाठी आलोसे श्री.ऋषिकेश देशमुख यांनी श्री.सुनिल कुशीरे, व्यवस्थापकीय संचालक यांच्यासाठी ७.५ टक्के प्रमाणे रु.८,०३,२५०/- व स्वतःसाठी तसेच महामंडळ कार्यालयाचे रु.५०,०००/- असे एकुण रु.८,५३,२५०/- इतक्या रकमेच्या लाचेची मागणी केल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आलेल्या पडताळणीअंती निष्पन्न झाले. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आलेल्या सापळा कारवाईमध्ये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आल्याने आलोसे श्री.ऋषिकेश देशमुख, उपविभागीय जलसंधारण अधिकारी व श्री. भाऊसाहेब गोरे, कंत्राटी लिपीक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे सिटी चौक, छत्रपती संभाजीनगर शहर येथे दिनांक ०७/०२/२०२३ रोजी गु.र.नं. ६०/२०२३ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

II. सदर प्रकरणी दाखल गुन्ह्याच्या एफ.आय.आर. मध्ये आरोपी म्हणुन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री.सुनिल कुशीरे यांचे नाव नमुद नाही. तसेच, सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये आलोसे श्री.सुनिल कुशिरे यांचा सहभाग निष्पन्न झालेला नाही. परंतु या प्रकरणात प्रशासकीय कसुरी दिसुन आल्याने त्यांची विभागीय चौकशी करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सविस्तर कसुरी अहवाल मृद व जलसंधारण विभागास सादर केलेला असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

III. श्री.सुनिल कुशिरे यांना अटक करुन पोलीस कोठडी/न्यायालयीन कोठडी न झाल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील कलम ४ अन्वये त्यांचे मानीव निलंबन करण्यात आलेले नाही.

(४) हे खरे नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ०८.०१.२०२४ रोजीचे कोणतेही निवेदन संबंधित विभागास प्राप्त झालेले नाही.

(५) I. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४ मधील तरतुदीनुसार आलोसे श्री.देशमुख यांना मृद व जलसंधारण विभागाच्या दिनांक २३.०२.२०२३ रोजीच्या आदेशान्वये अटकेत ठेवल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दि.०७.०२.२०२३ रोजी पासुन पुर्वलक्षी प्रभावाने शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

II.आलोसे श्री.देशमुख यांच्याविरुध्द दिनांक ३१.०५.२०२३ रोजीच्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

III.आलोसे श्री.ऋषीकेश देशमुख, तत्का. उपविभागीय जलसंधारण अधिकारी, वैजापूर व श्री.गोरे, कंत्राटी लिपिक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ यांच्याविरुध्द मा. न्यायालयात अभियोग दाखल करण्यासाठी दिनांक २५.०६.२०२४ रोजी सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने अभियोगपूर्व मंजुरी देण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी शहरासह ग्रामिण भागात महावितरण कडून लावण्यात आलेल्या डीपी अनेक ठिकाणी उघड्या असल्याबाबत**

**(१७)** * **८१७९२ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरासह ग्रामीण भागात रस्त्याच्या कडेला, शाळा परिसरात तसेच मुख्य रस्त्याच्या बाजूला महावितरणाकडून लावण्यात आलेल्या डीपी अनेक ठिकाणी उघड्या असून धोकादायक स्थितीत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वात्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी वारंवार अपघात होऊन जीवीत हानी होत असल्याने सदर डीपी तात्काळ बंद करावे तसेच त्यांना सुरक्षा कुंपण करण्याची मागणी नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन डीपी तात्काळ बंद करणे, डीपींना सुरक्षा कुंपण करणेबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

याबाबत मा. विधानसभा सदस्य, परभणी यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे दि. २९.०४.२०२४ रोजी खंडीत वीज पुरवठाबाबत बैठक घेऊन वितरण प्रणाली व रोहित्रांची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.

(२) हे खरे नाही.

परभणी शहर व परिसरातील वितरण पेटयांची पाहणी करुन वितरण पेटयांची दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

(३) वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या वितरण रोहित्रामुळे अपघात होऊ नये या दृष्टीने उपाययोजना म्हणून वितरण रोहित्रांना सुरक्षा कुंपण करण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीतील गाळ काढण्याबाबत**

**(१८) * ८२३३३ श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात दरवर्षी पावसाळ्यात पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत वाढ होऊन संपुर्ण शहर पाण्याखाली जाऊन नागरिक व शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचगंगा नदीत सुमारे साडेपाच लाख घनमीटर गाळ साचला असून गत १० ते १२ वर्षे हा गाळ काढण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन पंचगंगा नदीसह इतर नद्यांमधील गाळ तातडीने काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) असल्यास, याकडे दुर्लक्ष करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

पावसाळयादरम्यान अतिवृष्टी होऊन पंचगंगा नदीला पूर आल्यास कोल्हापूर शहरातील काही ठराविक नदीलगतचा परिसर व शहरातील सखल भागामध्ये पुराचे पाणी जाते व त्यामुळे तेथील नागरिक व शेतकऱ्यांचे नुकसान होते.

(२) हे अंशत: खरे आहे.

जलसंपदा विभागाच्या शासन निर्णय दि.२५/०७/२०२३ मधील तरतूदीनुसार पंचगंगा व इतर नद्यांमधील गाळ निष्कासन करण्याच्या दृष्टीने समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीचे अध्यक्ष संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आहेत. या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्याच्या समितीने पंचगंगा नदीतील गाळाच्या नजर पाहणीने केलेल्या निरीक्षणानुसार पंचगंगा नदीमध्ये साधारणपणे ५.५० लक्ष घनमीटर इतका गाळ साठला असल्याची शक्यता वर्तविली आहे.

(३) कोल्हापूर शहरातून वाहणाऱ्या पंचगंगा व इतर नद्यांची वहन क्षमता पुनर्स्थापित करुन पूराचा प्रभाव कमी करण्याच्या दृष्टीने गाळ, राडारोडे, बेटे व अडथळे काढण्यासाठी जलसंपदा विभागाच्या शासन निर्णय, दि.२५.०७.२०२३ नुसार गाळ काढण्याकरिता आवश्यक बाबींची पूर्तता करुन अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

तसेच कोल्हापूर शहर व परिसरातील पूरस्थिती आटोक्यात आणण्याकरीता जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र शाश्वत विकास प्रकल्प (MRDP) अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तळिये ( ता.महाड, जि. रत्नागिरी ) येथील दरडग्रस्तांना देण्यात आलेली घरे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत**

**(१९) * ८३५०० श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळिये (ता.महाड, जि.रत्नागिरी) येथील दरडग्रस्तांना शासनाने बांधून दिलेली घरे निकृष्ट दर्जाची असून अनेक घरांच्या भिंतींना तडे गेले असून रुफिंग शीट फुटली असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) तसेच येथील पाणी योजना पुर्ण झालेली नसल्यामुळे रहिवाशांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गावठाणातील घरांची दुरुस्ती व येथे नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) म्हाडामार्फत घरे बांधणीचे काम प्रगतीपथावर असून जल जीवन मिशन अंतर्गत तळीये येथे नळ पाणी पुरवठा योजना प्रस्तावित करण्यात आली असून सदर योजनेतील उदभव विहीर, पंपघर, पंपींग सामग्री, उर्ध्ववाहिनी, उंच साठवण टाकी कामे पूर्ण झाली आहेत. दरडग्रस्तांच्या पुर्ण झालेल्या घरांना सुरळीत पाणी पुरवठा सुरू असुन उर्वरीत घरे पुर्ण झाल्यानंतर सदर घरांना  पाणी पुरवठा सुरू करण्यात येईल.

तसेच, जिल्हा परिषद, रायगड मार्फत अंतर्गत रस्ते, मलनि:सारण वाहिनी, शाळा-अंगणवाडी इमारती इ. नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या असल्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी शासनास कळविले आहे.

-----------------

**मौजे कळवंडे ( ता.चिपळूण, जि. रत्नागिरी) येथील धरणाच्या दुरूस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२०)** * **७९४८९ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कळवंडे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील धरणाच्या दुरूस्तीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने धरणातील पाण्याच्या गळतीमुळे धरणाला धोका निर्माण झाल्याचे दिनांक ५ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धरणाच्या दुरूस्तीचे काम अनुभव नसलेल्या ठेकेदारांच्या नावाखाली संबंधित अधिकारीच करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गंभीर प्रकरणाची चौकशी स्पेशल व्हिजिलन्स स्कॉड नेमून करण्यात येईल असे आश्वासन मा.जलसंपदा मंत्री यांनी दिनांक २४ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धरणाच्या दुरुस्तीबाबत तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे,

कळवंडे धरणाच्या गळती प्रतिबंधक उपाययोजनेच्या दृष्टीने पावसाळयापूर्वी हाती घेतलेल्या मातीभरावाच्या दुरूस्ती कामाचा काही भाग दि.२८/०६/२०२३ रोजी घसरला आहे. तथापि, त्यामुळे धरणास धोका निर्माण झालेला नाही.
(२) हे खरे नाही.
सदर दुरूस्ती कामाची निविदा प्रक्रिया शासनाच्या प्रचलित नियमानुसार राबविण्यात येऊन त्यानुसार न्युनतम देकार असलेल्या अभिकरणास कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.
(३) होय.
(४) सदर कामाच्या चौकशीचे आदेश कोकण पाटबंधारे विकास महामंडळाने त्यांच्या दि.२३/०८/२०२३ अन्वये अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, मुंबई परिमंडळ, पाटबंधारे विभाग, ठाणे यांना दिले आहेत. त्यानुसार सदरची चौकशी अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, मुंबई परिमंडळ, पाटबंधारे विभाग, ठाणे यांच्या मार्फत करण्यात आली असून सदर चौकशीचा प्राथमिक अन्वेषण अहवाल कोकण पाटबंधारे विकास महामंडळाने दि.१०/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला असून त्याबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.

कळवंडे धरणाच्या कायमस्वरूपी गळती प्रतिबंधक उपाय योजनेच्या दृष्टीने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांच्याकडे आवश्यक प्रस्ताव क्षेत्रिय स्तरावरून दि.२८/२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आला आहे. तसेच याबाबत केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र (CWPRS), पुणे यांचे मार्गदर्शन घेण्यात येत आहे. केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र

(CWPRS), पुणे यांनी कळवंडे धरणाबाबत Geotechnical Studies, Electrical resistivity Study, Slope Stability Study इत्यादी अभ्यास करणे सुचविले असून त्यानुसार आवश्यक कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील शीव रेल्वे स्थानकादरम्यान मोबाईल चोरण्याचा प्रयत्न करणाऱ्या चोरटयाने पाठलाग करणाऱ्या पोलिस शिपायाचा केलेला खुन**

**(२१)** * **८०४०४ श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील शीव रेल्वे स्थानकादरम्यान मोबाईल चोरण्याचा प्रयत्न करणा-या चोरटयाचा पाठलाग करणा-या पोलिस शिपाईला आरोपींनी घेरुन पोलिसाच्या हातावर फटका देऊन इंजेक्शन दिल्यामुळे पोलिस शिपायाचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २ मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, मृत पावलेल्या पोलिसाच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक २७.०४.२०२४ रोजी पोलीस मुख्यालय, वरळी येथे नेमणूकीस असलेले पोलीस शिपाई यांनी ते रात्रीचे लोकल ट्रेनने प्रवास करीत असताना काही इसमांबरोबर त्यांची झटापट झाली. त्या दरम्यान कोणी तरी त्यांच्या पाठीत टोचल्याने त्यांची तब्येत बिघडल्याने दिनांक २९.०४.२०२४ रोजी सिव्हिल हॉस्पिटल, ठाणे या हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्याचे त्यांनी जबाब दिला आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी मयत फिर्यादी पोलीस शिपाई यांच्या जबाबानुसार दादर रेल्वे पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.५२२/२०२४ भादंवि कलम ३०२, ३९२, ३९४, ३२८, ३४ अन्वये दिनांक ०१.०५.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर मयत फिर्यादी हे दिनांक ०१.०५.२०२५ रोजी उपचारा दरम्यान मयत झाले.

या गुन्हयातील मयत फिर्यादी पोलीस शिपाई यांच्या जबाबानुसार सदर गुन्हयाचा तपास दादर रेल्वे पोलीस ठाणे यांच्याकडून करण्यात आला आहे. या गुन्हयातील मयत फिर्यादी यांचे वैद्यकिय परिक्षण अहवालानुसार त्यांच्या मृत्युचे कारण Coronary artery disease (Natural) असे नमूद केले आहे. यावरून मयत फिर्यादी पोलीस शिपाई यांचा नैसर्गिक मृत्यु झाल्याचे तपासात सिध्द झाले आहे. त्यामुळे दाखल गुन्हा घडलाच नसल्याचे व गुन्हयातील मयत फिर्यादी पोलीस शिपाई यांनी तपासात खोटी फिर्याद दिल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हयाची ‘ब’ वर्ग समरी मंजूर होणेसाठी मा.न्यायालयात अहवाल सादर करण्यात आलेला आहे.
(३) मृत पावलेल्या पोलीस शिपाई यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आर्वी (जि.वर्धा) येथील उपसा सिंचन योजना प्रलंबित असल्याबाबत**

**(२२)** * **८२४१० श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील निम्न वर्धा प्रकल्पातील आर्वी उपसा सिंचन योजनेस सन २०१८-१९ मध्ये रु.२५१ कोटी रुपये मंजूर करुन कामाचे कंत्राट मे.जैन इरिगेशन सिस्टिम, जळगांव यांना दिनांक २० जून, २०१८ रोजी देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, करारानुसार सदर काम दिनांक १९ जून, २०२० पर्यंत पुर्ण करणे अपेक्षित असतांना केवळ ३२ टक्के काम पुर्ण झाले असतानाही कामाचे देयक अदा करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाच वर्षाचा कालावधी होऊनही ६७ टक्के काम अद्यापही पुर्ण करण्यात न आल्याने १६ गावातील ५६६९ शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, करारानुसार काम पुर्ण न झाल्याने करार रद्द करणे आवश्यक असतांना देखील संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमतामुळे कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंत्राटदार व दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यासह सदरहू काम तात्काळ पुर्ण करण्यासह कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर योजनेमध्ये काम रु.२३९.१७ कोटी (४.९९ टक्के कमी दराने) ईपीसी (Engineering procurement & construction) तत्वावर मे. जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेड जळगाव यांना कार्यारंभ आदेश क्र.१८४५ दि.२०.०६.२०१८ मध्ये करारनामा क्र. ईपीसी/निवप्र/०१/२०१८-१९ अन्वये आवंटित करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही,

सद्य:स्थितीत सदर योजनेचे काम ४३% (एप्रिल-२०२४ अखेर) झालेले असून झालेल्या कामाचे देयक करारनाम्या प्रमाणे कंत्राटदाराला अदा करण्यात आलेले आहे.

(३) हे खरे नाही,

सद्य:स्थितीत सदरील योजनेचे ५७% काम शिल्लक आहे. योजने अंतर्गत एकुण ८४०० हे. सिंचन क्षमता असुन जुलै २०२४ अखेर पर्यंत ५४७७ सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. त्या अंतर्गत १६ गावातील ५६६९ शेतकऱ्यांपैकी १० गावातील ३८६१ शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ होणार आहे. व उर्वरित २७२३ हे. सिंचन क्षमता निर्मितीचे काम जुन २०२५ अखेर पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजित असुन त्यामध्ये ६ गावातील १८०८ शेतकऱ्यांचा समावेश आहे.

(४) हे खरे नाही,

करारनाम्याप्रमाणे विहित वेळेत काम पूर्ण न झाल्यामुळे व कामाची गती संथ असल्यामुळे दंड आकारणी सुरू आहे. कंत्राटदारास वेळोवेळी कामे विहित वेळेत गतीने पुर्ण करण्याकरिता पत्राव्दारे व प्रत्यक्ष निर्देश देण्यात आले

(५) कंत्राटदारास वेळोवेळी कामे विहित वेळेत पुर्ण करण्याकरिता पत्राव्दारे व प्रत्यक्ष निर्देश देण्यात आले. कामाची गती संथ असल्यामुळे कंत्राटदारास दंड आकारणी कार्यवाही सुरु आहे व २०२५ पर्यंत काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याबाबत

**(२३) * ८०८५९ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शालेय शिक्षण विभागातील लाचलुचपत प्रकरणात सापडलेले "वर्ग-१" व "वर्ग-२" च्या अधिकाऱ्यांची खुली अथवा गुप्त चौकशी करण्याबाबत दिनांक १४ जून, २०२२ रोजीच्या पत्रान्वये महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी अधिकाऱ्यांवर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण विभागात अकार्यकारी पद नसल्यामुळे अशा अधिकाऱ्यांना ९ महिन्यानंतर पुन्हा कार्यकारी पदावर सेवेत घेण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भ्रष्ट अधिकाऱ्यांवर विभागांतर्गत कारवाईचे कोणतेही भय राहिलेले नसून यासंदर्भात सध्या अस्तित्वात असलेले कायदे अधिक कडक करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात येत आहे तसेच कारवाईतील विलंबास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) I. शालेय शिक्षण विभागातील एकूण ३२ अधिकाऱ्यांपैकी २४ अधिकारी हे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळा कारवाईमधील दाखल गुन्हयांतील आरोपी असून त्यांची उघड चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सुरु करण्यात आलेली असून त्यापैकी आलोसे विष्णू मारुती कांबळे, शिक्षणाधिकारी, माध्यमिक जिल्हा परिषद, सांगली व आलोसे बळीराम गणपत चौरे, प्राचार्य (शिक्षण), नेमणूक-शिक्षण व प्रशिक्षण संस्था, लातूर या दोघांविरुद्ध उघड चौकशीच्या तपासाअंती अपसंपदा संपादीत केल्याचे निष्पन्न झाल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे.

II. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दिनांक ११.०५.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये विभागांतर्गत अकार्यकारी पदे निश्चित केलेली असून संबंधित अधिकाऱ्यांना अकार्यकारी पदावर पुन:स्थापित करण्यात येते.

(४) लाचेच्या सापळा प्रकरणात कारवाई झालेल्या अधिकाऱ्यांविरुद्ध निलंबन व विभागीय चौकशीची कार्यवाही तसेच भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ च्या कलम १९ अन्वये न्यायालयात खटला दाखल करण्यासाठी अभियोगपुर्व मंजुरीबाबत संबंधित प्रशासकीय विभागामार्फत प्रकरणनिहाय सक्षम प्राधिकारी यांच्या मंजुरीने कार्यवाही करण्यात येते.

(५) I. शालेय शिक्षण विभागातील एकूण ३२ अधिकाऱ्यांपैकी एकूण २६ अधिकाऱ्यांविरुध्द सापळा कारवाईत दाखल गुन्हयांचे दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करण्यात आलेले आहे. तर १) आलोसे रामदास वालझाडे, शिक्षणाधिकारी, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे २) आलोसे विष्णु कांबळे, शिक्षणाधिकारी, जिल्हापरिषद, सांगली ३) आलोसे विजयकुमार सोनवणे, अधीक्षक, माध्यमिक शिक्षण विभाग, सांगली ४) आलोसे श्रीम.वैशाली पंकज विर, शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद नाशिक, ५) श्रीमती लता सखाराम सानप, शिक्षणाधिकारी, प्राथमिक जिल्हापरिषद या पाच अधिकाऱ्यांविरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याच्या अनुषंगाने अभियोगपूर्व मंजुरीबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

II.आलोसे मोहन शशिकांत देसले, शिक्षणाधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग यांच्याविरुध्द अभियोगपूर्व परवानगी नाकारण्यात आल्याने पूर्नविलोकन प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जत (जि.सांगली) तालुक्यासाठी म्हैसाळ योजनेच्या माडग्याळच्या कालव्यातुन पाणी सोडण्याबाबत

**(२४) * ८०९२८ श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील ६४ गावे तसेच जत व आटपाडी तालुक्यांतील गावांना माहे डिसेंबर,२०२३ पासूनच तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याने म्हैसाळ योजनेच्या माडग्याळ कालव्यातुन पाणी सोडण्याची शेतकरी व ग्रामस्थांनी मागणी केली असुन याठिकाणी रक्तदान आंदोलन करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रक्तदान आंदोलनाच्या अनुषंगाने अंकलगी तलावात पाणी सोडण्यासाठी २४ कोटी रुपयांची योजना राबविण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले असुन याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,,

(३) असल्यास, जिल्हयातील ६४ दुष्काळी गावातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी शासनाने पुण्यातून विसर्ग होणाऱ्या पाण्याचे ताकारी, टेंभू, म्हैसाळ आणि आरफळ या योजनांच्या आवर्तनाचे नियोजन करावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान केली असुन याबाबत कोणती उपाययोजना केली आहे,

(४) असल्यास, तालुक्यातील सर्व पाझर तलाव व बंधारे भरण्याच्या नियोजनाकरीता जमिन भूसंपादीत करण्यात आली असून शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत जमिनीचा मोबदला देण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व गावांना सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत तसेच संपादित जमिनींचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

जत तालुक्यातील मूळ म्हैसाळ योजनेमधून पूर्णतः व अशंतः वंचित असणाऱ्या ६५ गावांना शेतीसाठी, जनावरांना व नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी दि.०१/०२/२०२४ रोजी मौजे ढालगांव, ता.जत येथे "रास्ता रोको" करत रक्तदान केले.

(२) अंकलगी तलावात जाणाऱ्या नाल्यामध्ये तसेच नजिकच्या माडग्याळ, व्हसपेठ, गुड्डापूर तलावात पाणी सोडण्यासाठी रु.२३८३.७६ लक्षची निविदा प्रक्रिया प्रगतीत असून निधी उपलब्धतेनुसार कामे पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(३) सन २०२३ च्या खरीप हंगामात टेंभू, ताकारी व म्हैसाळ या योजनांद्वारे १४.३१ TMC पाणी उपसा केले असून त्यापैकी ६.४७ TMC पाणी जनावरांना व नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी देण्यात आलेले आहे.

(४) व (५) म्हैसाळ योजना (जत भाग) मधील कामे पूर्ण करण्यासाठी सांगली व सोलापूर जिल्ह्यातील एकुण ११२१.५५ हे. इतके भुसंपादन करावे लागणार आहे. त्यापैकी ४८८.५८ हे. इतकी जमिन संपादीत झालेली आहे. यामध्ये सन २०२१ पासून १२८ हे. क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादित केलेले आहे. सदर क्षेत्राकरीताचा मोबदला रक्कम रु.५०.४३ कोटी लाभधारकांना देणेत

आलेला आहे, उर्वरीत ६३२.९७ हे. पैकी २०८.७२ हे. चे मुल्यांकन खाजगी वाटाघाटीने मंजूर असुन खरेदी प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. तसेच २६५.९० हे. खाजगी वाटाघाटीने करावयाचे भुसंपादन प्रस्ताव महसूल विभागास सादर करण्यात आलेले असुन कार्यवाही प्रगतीत आहे. उर्वरीत भुसंपादनाची कार्यवाही पुढील २ वर्षात निधी उपलब्धतेनुसार पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) धरणाच्या डाव्या व उजव्या मुख्य कालव्याला लागलेली गळती थांबविण्याबाबत

**(२५) * ८१८१६ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) येथील धरणाच्या वारणा डाव्या व उजव्या कालव्याला लागलेल्या गळतीमुळे शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे नुकसान होत असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गळती थांबविण्याची मागणी शेतकरी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधित विभागाकडे करुनही यासंदर्भात अद्यापही कोणती कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गळतीमुळे अनेक अल्पभूधारक शेतकऱ्यांना त्यांच्या शेतामध्ये येणाऱ्या पाण्यामुळे पीक घेता न येणे, शेतीची मशागती करण्यास अडचणी येणे, ऊस पीकाची उत्पादन क्षमता कमी होऊन दलदलीमुळे ऊस पीक बाहेर काढण्यासाठी येणाऱ्या खर्चात विलक्षण वाढ होत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागत असून योग्य मोबदला मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दुसरीकडे संबंधित विभागाचे अधिकारी / कर्मचारी शेतकऱ्यांवर पाणीपट्टीची आकारणी करुन त्याची वसूली कारखान्याच्या बिलातून करुन ती न भरल्यास सातबाऱ्यावर त्याचा बोजा चढविण्याबाबतची कार्यवाही करतात, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोन्ही कालव्यांची दुरुस्ती करणे, पाणीपट्टीची माफी करणेबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.
वारणा डावा कालवा कि. मी. ० ते २६ मध्ये एकूण सिंचन क्षेत्र १४१८ हेक्टर इतके असून एकूण १३ गावातील बहुतांश क्षेत्रावर ऊसाचे पिक घेणेत येत असून कालव्याच्या भरावामधून काही ठिकाणी गळती होत असल्याने सदर क्षेत्रापैकी काही क्षेत्र नापिक होत असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही.
या विषयी विविध स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे क्षेत्रिय कार्यालयांकडे मागणी केलेली आहे. त्यानुसार पोट कालव्यांची अत्यंत गरजेची दुरुस्ती कामे तातडीने पूर्ण केली असून कालवा गळती थांबविण्याच्या दृष्टीने अस्तरीकरण करणेबाबतचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.
(३) हे खरे नाही.
कोणत्याही शेतकऱ्याने अशा प्रकारची तक्रार अथवा निवेदन दिलेले नाही.
(४) हे खरे नाही.
बाधित होणाऱ्या क्षेत्रातील पाणीपट्टीची आकारणी केलेली नाही. तसेच सातबाऱ्यावर बोजा चढविण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(५) गळती थांबविण्याच्या अनुषंगाने वारणा प्रकल्पाच्या पोट कालव्यांच्या आवश्यक दुरूस्तीची कामे विभागामार्फत वेळोवेळी करण्यात आली आहे. तसेच त्यासाठी अस्तरीकरण व इतर अनुषंगिक उपाययोजना करण्याचे नियोजित असून त्याकरिता अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगती पथावर आहे.
बाधित होणाऱ्या क्षेत्रातील पाणीपट्टीची आकारणी केलेली नसल्याने पाणीपट्टी माफी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जव्हार व मोखाडा (जि.पालघर) तालुक्याच्या ग्रामीण भागात**
**लघु पाटबंधाऱ्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत**

**(२६) * ८१२८९ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार व मोखाडा (जि.पालघर) तालुक्याच्या ग्रामीण भागात लघु पाटबंधारे विभागातून वर्षाकाठी पंधरा ते सोळा बंधा-यांची नवीन बांधकामे तर काही बंधाऱ्यांची दुरुस्ती केली जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधाऱ्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने वर्षभरातच या बंधाऱ्यांना मोठ्या प्रमाणात गळती लागली असून कोणत्याही क्षणी तेथे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांच्या संगनमताने ही कामे होत असल्यामुळे त्यांचेवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी आमसभेत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत तसेच यातील दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

जिल्हा जलसंधारण अधिकारी, ठाणे विभागांतर्गत जिल्हा वार्षिक योजना व आदिवासी उप योजना अंतर्गत सन २०२३-२४ वर्षात ११ बंधाऱ्यांची कामे पूर्ण करण्यात आली असून दुरुस्तीचे कोणतेही काम करण्यात आले नाही.

जिल्हा जलसंधारण अधिकारी, पालघर विभागामार्फत सन २०२१-२२ या वर्षात जव्हार तालुक्यात ४ नवीन व २ बंधारा दुरुस्ती व मोखाडा तालुक्यात ९ नवीन व २ बंधारा दुरुस्तीची कामे पुर्ण करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे सन २०२२-२३ या वर्षात जव्हार तालुक्यात ५ नवीन व मोखाडा तालुकयात ६ नवीन अशी एकूण ११ कामे हाती घेण्यात आली होती. त्यापैकी १० कामे पूर्ण झाली असून एक काम प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे नाही.

पूर्ण झालेली १० बंधाऱ्याची कामे सुस्थितीत असून त्यात पाणीसाठा होत आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) याबाबत चौकशी करुन चौकशीअंती योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वाकोला (मुंबई) येथील कोटक महिंद्रा बँकेच्या कर्मचाऱ्यांनी बेकायदा स्टँम्पड्युटीची रक्कम**
**शासनाकडे वर्ग न करता स्वत:च्या बँक खात्यात वळती केल्याबाबत**

**(२७) * ८४२२८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांताक्रुझ पूर्व, वाकोला, मुंबई येथील कोटक महिंद्रा बँकेच्या कर्मचाऱ्यांनी माहे एप्रिल २०२२ ते जून, २०२३ या कालावधीत २४६ ग्राहकांना कर्ज मंजूर करताना ग्राहकांकडून शासनातर्फे आकारण्यात येत असलेली स्टँम्पड्युटीची रक्कम शासनाच्या तिजोरीत न भरता परस्पर स्वत:च्या बँक खात्यावर वळती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांनी सुमारे २ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत बँक व्यवस्थापनाने वाकोला पोलीस ठाण्यात दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल केला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीसात गुन्हा दाखल करुन ही अद्याप संबंधित १० दोषी बँक कर्मचाऱ्यांविरुद्ध कोणतीच कारवाई केली नसल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी दि.०८.०२.२०२४ रोजी, वाकोला पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१६३/२०२४, कलम ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७७ (अ), ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) सदर प्रकरणी झोनल बिझनेस मॅनेजर, कोटक महिंद्रा बँक यांनी दि.०८.०२.२०२४ रोजी कोटक महिंद्रा बँकेची, रु.१,०२,०३,४५२/- इतक्या रकमेची फसवणुक केल्यासंदर्भात दिलेल्या फिर्यादीनुसार सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला ही बाब खरी आहे.
(३) व (४) संबंधित दोषींपैकी, ४ आरोपींना अटक करण्यात आले असून सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत. २ आरोपींना सी.आर.पी.सी. ४१ (१) (अ) अन्वये, नोटीस बजावण्यात आली आहे. इतर फरारी ४ आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने पोलीसांमार्फत अधिक तपास करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाडा व विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील म्हसेपाडा गावाशी जोडणाऱ्या बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२८)** * **८०४९९ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा व विक्रमगड (जि.पालघर) तालुक्याच्या हद्दीत असलेल्या म्हसेपाडा गावाला जोडणाऱ्या बंधाऱ्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून काही काम अपूर्ण असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंधाऱ्याचे काम अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे झाल्याने पावसाळ्यात गावाचा संपर्क पूर्णपणे तुटत असून विद्यार्थी, रुग्ण व नागरिकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासह बंधाऱ्याचे काम तातडीने पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) बंधाऱ्याच्या ठिकाणी जाणारा पोहोच मार्ग खाजगी मालकीच्या शेतातून जात असल्याने व शेतात पीक असल्याने काम पुर्ण करण्यास विलंब झालेला आहे. सद्यस्थितीत काम चांगल्या दर्जाचे करून पुर्ण करण्यात आल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरात मसाजच्या नावाखाली स्पा सेंटरमध्ये वेश्या व्यवसाय सुरु असल्याबाबत**

**(२९)** * **८१४१९ श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथे विविध ठिकाणी स्पा तसेच मसाज सेंटरच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात वेश्या व्यवयास सुरु असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खराडी भागातील ग्रांट रोड कमर्शिअल झोन, गेरा इम्पेरियम अल्फा येथील 'द रिलीफ स्पा' या ठिकाणी वेश्या व्यवसाय सुरु असल्याचे माहे एप्रिल २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) तसेच धनकवडीतील बालाजीनगर बसस्थानकाजवळील एका अपार्टमेंटमध्ये दिशा आयुर्वेदिक मसाज उपचार केंद्राच्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरु असल्याचे माहे एप्रिल २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे शहरातील वेश्या व्यवसायाला आळा घालण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशंत: खरे आहे,
पुणे शहरातील १४ ठिकाणी स्पा/मसाज सेंटरमध्ये वेश्याव्यवसाय सुरु असल्याचे आढळून आले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.

(४) पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यक्षेत्रामध्ये स्पा सेंटरमध्ये चालू असलेल्या वेश्या व्यवसायाच्या प्रकारास आळा घालण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

१) वेळोवेळी संशयास्पद ठिकाणी तपासणी करण्यात येते.

२) अचानकपणे सर्व मसाज सेंटर येथे भेटी देवून त्यांची चौकशी करण्यात येते.

३) गोपनीय बातमीदारांमार्फत माहिती काढून वेश्या व्यवसायाचा प्रकार आढळून आल्यास प्रचलित कायद्यानुसार कारवाई करण्यात येते.

पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यक्षेत्रामध्ये स्पा सेंटरची तपासणी केली असून सन २०२४ मध्ये एकूण १४ गुन्हे तात्काळ दाखल करण्यात आले आहेत. सदर प्रकरणी वेळीच कारवाई करण्यात आलेली असल्याने पोलीस अधिकारी दोषी असल्याचे दिसून येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या मंत्रालयातील बँक खात्यातून परस्पर रक्कम काढण्यात आल्याबाबत**

**(३०) * ८०४७४ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजन साळवी (राजापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या बँक खात्यातून ४७ लाख ६० हजार इतकी रक्कम परस्पर काढण्यात आल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी बनावट स्टॅम्प, चेक आणि स्वाक्षरीचा वापर करून चार टप्प्यामध्ये ही रक्कम काढण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी मरीन ड्राईव्ह पोलिस ठाणे, मुंबई येथे तक्रार नोंदविली असून पोलिस तपास अद्याप सुरु असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यापूर्वी देखील शासनाच्या पर्यटन विभागात माहे मार्च, २०२४ मध्ये अशाचप्रकारे ६८ लाख रुपये परस्परिरत्या काढण्यात आले असताना पुन्हा अशा प्रकारच्या घटना घडत असून यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

क्रीडा विभागाच्या बँक खात्यातून झालेल्या अपहार प्रकरणी मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे, मुंबई येथे दि.२२.०४.२०२४ रोजी, गु.र.क्र. ९३/२०२४, कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७३, ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(४) व (५) पर्यटन संचालनालय, मुंबई या कार्यालयाच्या बँक खात्यातून माहे मार्च, २०२४ मध्ये रु.६८.६७ लक्ष इतक्या रकमेचा अपहार झाला आहे. सदर प्रकरणी मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे, मुंबई येथे दि.११.०३.२०२४ रोजी, गु.र.क्र. ३४, ४१९, ४२०, ४६५, ३६७, ४६८, ४७१, ४७३ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणी दाखल गुन्ह्यांच्या अनुषंगाने पोलीसांमार्फत अधिक तपास करण्यात येत आहे. बनावट कागदपत्रांआधारे अशा प्रकारे पैशांचा अपहार झाल्याची घटना निदर्शनास येताच, चौकशीअंती संबंधितांवर तातडीने गुन्हे दाखल करण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याणीनगर जंक्शन (जि.पुणे) येथील येरवडा परिसरात अल्पवयीन मुलाने भरधाव गाडी चालवून केलेला अपघात

**(३१) * ८३७२१ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील कल्याणीनगर जंक्शन, येरवडा परिसरात दिनांक १८ मे २०२४ रोजी वा त्यासुमारास मध्यरात्री वेदांत अगरवाल या अल्पवयीन मुलाने दारूच्या नशेत पोर्शे कार भरधाव वेगात चालवत दुचाकीला धडक दिल्याने दोन अभियंत्यांचा जागीच मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेत गाडीची नोंदणी, नंबर प्लेट तसेच चालक परवाना नसलेल्या अल्पवयीन मुलाने भरधाव वेगाने रस्त्यावर गाडी चालविली असतानाही दोषी मुलाला वाचविण्यासाठी विविध स्तरावरुन बेकायदेशीररित्या मदत केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) सदर घटनेच्या अनुषंगाने राज्यात बहुतांश ठिकाणी वाढत चाललेली पब संस्कृती, रात्रभर नियमबाह्यरित्या सुरु असलेले बार व पब, त्यामध्ये अल्पवयीन मुलांना देण्यात येणारे प्रवेश, अशाठिकाणी अंमली पदार्थांचा होत असलेला वापर, यात पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांचे असलेले संगनमत, परिणामी विद्यार्थी, तरुण व नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी कारवाई करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२४ मध्ये गृह मंत्री, प्रधान सचिव, गृह विभाग यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या गंभीर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन सर्व संबंधितांवर व दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) हे अंशतः खरे आहे.

विधी संघर्षित बालकास दाखल गुन्ह्याच्या न्यायालयीन प्रक्रियेमध्ये मदत व्हावी याकरीता विधी संघर्षीत बालकाचे वडील, आई यांनी खासगी इसमामार्फत ससून रूग्णालय येथील डॉक्टर व अन्य कर्मचारी यांना लाच देऊन विधी संघर्षीत बालकाच्या रक्ताच्या नमुन्याऐवजी त्याच्या आईच्या रक्ताची ससुन सर्वोपचार रुग्णालयाच्या रजिस्टरमध्ये खोटी नोंद घेऊन सदर सॅपल न्यायवैद्यक तपासणी करिता देऊन संगनमताने पुरावा नष्ट करण्याचा फौजदारी पात्र गुन्हा केल्याचे पोलीस तपासामध्ये निष्पन्न झाले आहे.

(३) हे खरे नाही. पुणे शहरातील सर्व पोलीस ठाणेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार हे शासनाने नेमुन दिलेल्या विहीत वेळेत हॉटेल, पब व आर्केस्टा बंद करित असून शर्तीपेक्षा जास्त वेळ चालू असणाऱ्या बार, हॉटेल, पब यांच्यावर प्रचलित कायद्यानुसार कारवाई करण्यात येते. त्यानुसार, एप्रिल, २०२४ अखेर एकूण ७ हॉटेल/पब/बार यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

(४) होय.

मा.विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक २०.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी विविध मुद्द्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करून त्याबाबतची माहिती उपलब्ध करून देण्याबाबत मागणी केली आहे.

(५) प्रस्तुत गुन्ह्याच्या अनुषंगाने विधी संघर्षीत बालक, त्याचे पालक, ससून रुग्णालयातील डॉक्टर आणि अन्य कर्मचारी यांच्याविरुद्ध येरवडा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ३०६/२०२४ भा.द.वि. कलम ३०४, २७९, ३३८, ३३७, ४२७,१२० (ब), २०१, २१३, २१४, ४६७, ४६६, ४६८, ४७१, मोटार वाहन कायदा कलम १८४, ११९, १७७ व भ्रष्टाचार अधिनियम कलम ७, ७ (अ), १३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विधी संघर्षीत बालकास बेकायदेशीररित्या मद्य विक्री करणारे हॉटेल कोझी व हॉटेल ब्लॅक क्लब या आस्थापनांमधील मॅनेजर व अन्य स्टाफ यांच्या विरुद्ध येरवडा पोलीस स्टेशन गु. र. न. ३०७/२०२४ भा.द.वि. कलम ४२०, बाल न्याय अधिनियम

२०१५ कलम ७५, ७७, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १८ सह ६५ ई, मोटार वाहन कायदा कलम ३,५,९९(अ), १९९ (अ)(२), ३९/१९२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विधी संघर्षग्रस्त बालकाचे आजोबा यांनी पोर्शे कारचे चालक यांना धमकी दिल्याबद्दल आणि विधी संघर्षीत बालकाच्या वडीलांसोबत संगनमत करुन कारचालकास बेकायदेशीर लपवून ठेवण्याच्या उद्देशाने डांबून ठेवले म्हणून विधीसंघर्षग्रस्त बालक याचे आजोबा व वडील यांचे विरुद्ध चालक यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन येरवडा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३२२/२०२४, भा.द.वि. कलम ३४२, ३६५, ३६८, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

येरवडा पोलीस स्टेशन येथे दाखल गु.र.नं.३०६/२०२४ या गुन्ह्याचे प्रकरण बेजबाबदारपणे, निष्काळजीपणे हातळल्याने येरवडा पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक यांना दि.२४/०५/२०२४ रोजी पासून शासकीय सेवेतून निलंबित करण्यात आलेले असून याबाबत प्राथमिक चौकशी पूर्ण झाली असून नमुद प्रभारी अधिकारी व इतर अधिकारी/अंमलदार यांच्याविरूध्द विभागीय चौकशी आदेशीत करण्यात आली आहे.

तसेच सदर अपघाताच्या अनुषंगाने सखोल तपास करून (Proactively) गुन्ह्यांचा सुक्ष्मपणे तपास करून चांगले पुरावे निष्पन्न करून आतापर्यंत विधी संर्घषग्रस्त बालक व त्याची आई, वडिल, आजोबा, डॉक्टर, रक्त बदलण्यासाठी मदत करणारे, पब मध्ये मद्य देणारे मालक व मॅनेजर अशा एकुण १५ आरोपींना अटक करून त्यांची पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुंबईतील साकीनाका परिसरात झोपडपट्टी वासियांसाठी बांधण्यात आलेल्या इमारतीमधील सदनिकांचा बोगस कागदपत्रे सादर करुन केलेला गैरव्यवहार

**(३२) * ८०८७२ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील साकीनाका येथील शांतीनगर, बैलबाजार परिसरातील झोपडपट्टीवासियांसाठी बांधण्यात आलेल्या इमारतीमधील सदनिकांचा बोगस कागदपत्रांच्या आधारे गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गैरव्यवहार संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची एसआयटीद्वारे चौकशी करण्याची मागणी विरोधी पक्ष नेता, विधानसभा यांनी दिनांक ७ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

साकीनाका येथील क्रांतीनगर विभागातील झोपडीधारकांनी बनावट कागदपत्रे बनवून शासनाची फसवणूक केल्याची फिर्याद साकीनाका पालिस ठाणे येथे दाखल करण्यात आली आहे.

(३) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी सदर प्रकरणी एसआयटीमार्फत चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केल्याचे उपलब्ध अभिलेखांमध्ये शोध घेतला असता, आढळून येत नाही.

(४) व (५) भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाच्या जमिनीवरील साकीनाका येथील क्रांतीनगर वसाहतीमधील बाधित झोपडीधारकांचे अंतिम परिशिष्ट-२ दि. २८.११.२०१७ व तद्नंतर पुरवणी परिशिष्ट-२ पारित करण्यात आले आहे. सदरहू झोपडीधारकांचे पुनर्वसन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे. सदर झोपडीधारकांना दि.४.३.२०२४ रोजी सदनिका वाटप करताना काही झोपडीधारक संशयास्पद वाटत असल्याने, एमएमआरडीए कडून दि.१३.५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या कागदपत्रांची फेरतपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत सक्षम प्राधिकारी-७, झोपुप्रा, मुंबई यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच सदर संशयास्पद झोपडीधारकांविरुध्द पोलिस ठाणे, साकीनाका येथे गु.र.क्र.२३९/२०२४ दाखल करण्यात आला आहे. या गुन्हयाच्या अनुषंगाने साकीनाका पोलिस ठाणे यांच्या दि. ७.३.२०२४ च्या

पत्रास अनुसरुन पुढील चौकशीसाठी ३८ झोपडीधारकांची कागदपत्रे सक्षम प्राधिकारी-७, झोपुप्रा, मुंबई यांच्या कार्यालयाने उपलब्ध करुन दिलेली आहेत.

-----------------

**मुंबईतील लीलावती रुग्णालयाच्या तत्कालिन विश्वस्त मंडळाकडून झालेला गैरव्यवहार**

**(३३) * ८०१९०  श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लीलावती रुग्णालयात तत्कालिन विश्वस्त मंडळाकडून वकील आणि सल्लागार तसेच इतर कायदेशीर खर्च यावर मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करून सुमारे ५०० कोटींचा गैरव्यवहार केल्याचे लीलावती रुग्णालयाच्या नविन विश्वस्त मंडळाने पत्रकार परिषद घेऊन माहे १ मे २०२४ च्या सुमारास निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरव्यवहार संस्थेने केलेल्या न्यायवैद्यक आर्थिक लेखापरीक्षणाद्वारे (फॉरेन्सिक फायनानशियल ऑडीट) निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जुन्या विश्वस्त मंडळाकडून कोविड कालावधीत न्यायालये बंद असतानाही वकील व सल्लागार यांचेवर करोडो रुपयांचा बेकायदेशीर खर्च करणे, नव्याने स्थापन केलेल्या मधुलक्ष्मी ट्रस्टच्या निधीचा गैरवापर, बनावट कंपन्यांना पैसे देणे तसेच वैद्यकीय उपकरणे खरेदीमध्ये गैरव्यवहार केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही

मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१७९६५/२०२२ मध्ये दि.१८-०९-२०२३ रोजी दिलेल्या निर्देशानुसार सहाय्यक धर्मादाय आयुक्त-५, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांनी दि.१४-१२-२०२३ रोजी पारीत केलेल्या सामाईक न्यायनिर्णय व आदेशानुसार विविध बदल अर्ज निकाली काढले आहेत.

लिलावती किर्तीलाल मेहता मेडिकल ट्रस्टतर्फे विश्वस्त श्रीमती चारु किशोर मेहता यांनी लिलावती किर्तीलाल मेहता मेडिकल ट्रस्टच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करण्यात यावी अशी  मागणी करणारा अर्ज धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे  क्र.३७/२०२४ अन्वये दाखल केला आहे.

सदर ट्रस्टतर्फे दाखल अर्ज क्र. ३७/२०२४ वर सुनावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे सदर विशेष ऑडिट मधील मजकुराबाबत आजघडीला काहीही सांगता येत नाही. सध्या मा. सर्वोच्च न्यायालयाने विनाविलंब व तातडीने निकाली काढण्याचे निर्देश दिलेल्या लिलावती रुग्णालय विश्वस्त मंडळाशी निगडीत पक्षकारांशी संबंधित इतर प्रकरणांची सुनावणी धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेसमोर प्रकरण प्रलंबित  आहे.

(२) हे खरे नाही.

सद्यस्थितीत सदर ट्रस्टतर्फे दाखल अर्ज क्र. ३७/२०२४ वर सुनावणी अद्याप न झाल्यामुळे सदर विशेष ऑडिट मधील मजकुराबाबत आजघडीला काहीही सांगता येत नाही.

(३) हे खरे नाही.

सदर ट्रस्ट तर्फे आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याकरिता दाखल केलेल्या अर्जावर अद्याप सुनावणी न झाल्याने विशेष ऑडीट बाबत पर्यायाने ट्रस्टच्या निधीचा गैरवापर,बनावट कंपन्याना पैसे देणे, इत्यादीबाबत आजच्या घडीला भाष्य करता येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था कायदा, १९५० चे कलम-७४ नुसार धर्मादाय आयुक्त यांचे समोरील सर्व चौकशी व अपिल प्रकरणे ही न्याय चौकशी आहेत व ती कायद्यामध्ये नमुद तरतुदीनुसार चालविली जातात. या चौकशीमध्ये दोषी आढळल्यास संबंधितावर कायद्याप्रमाणे योग्य ती कारवाई करता येते.

तसेच उक्त कायद्याच्या कलम -३३ व कलम-६९ नुसार एखाद्या सार्वजनिक न्यासाचे विशेष ऑडिट करण्याचे निर्देश धर्मादाय आयुक्त देऊ शकतात. या तरतुदी अंतर्गत सदर ट्रस्टचे विशेष ऑडिट करण्याबाबत निर्णय प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.